**सर्वांना नवीन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा**

**'स्नेहवन'मधील घटना- घडामोडींची आणि संस्थेच्या प्रगतीची माहिती देणारे हे वार्तापत्र यापुढे दरमहा प्रकाशित होणार आहे. अवश्य वाचा आणि संस्थेच्या वाटचालीत सहभागी व्हा. 'स्नेहवन'ला नक्की भेट द्या.**

एक आशेचा किरण

# स्नेहवन वार्ता

संपादन व मार्गदर्शन : नयना निर्गुण
संकलन व लेखन : श्रीकांत, वैभव, दीपक

जानेवारी २०२४

या सुखांनों साद घालु
दु:खितांच्या जिवनी...
फुल नाही तर पाकळी होवू।
दु:खितांच्या जिवनी सुगंध देवू।।

वेबसाईट- www.snehwan.in | फेसबुक- www.facebook.com/snehwan | Instagram- www.instagram.com/ashok.snehwan | पत्ता : स्नेहवन, कोयाळी फाटा, कोयाळी फॉरेस्ट, कोयाळी तर्फे चाकण, ता. खेड, जि. पुणे - ४१०५०१


**जनमत**

## महाराष्ट्राचा 'सोनम वांगचूक'

थ्री इडियट्स या चित्रपटामधील आमिर खानने रंगवलेले फुनसूख वांगडू हे पात्र सोनम वांगचूक या व्यक्तिमत्वावर आधारीत होते. अगदी तशाच धर्तीवर येत्या काही वर्षांत 'स्नेहवन' या संस्थेचे संस्थापक अशोक देशमाने या व्यक्तीच्या कार्यावर आधारित एखादा मराठी चित्रपट निघायला काहीच अडचण येणार नाही. अशोकजींचे कामही तितकेच मोठे होऊ पाहतेय.

महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या होत असलेल्या दुर्दैवी आत्महत्या हा विषय अजूनही पूर्णपणे थांबलेला नाही. त्या विषयाला अनेकांनी विविध माध्यमातून वाचा फोडण्याचा प्रामाणिकपणे प्रयत्न केला. पण त्याही पलिकडे जाऊन या आत्महत्या केलेल्या शेतकरी बांधवांच्या लेकरांसाठी रचनात्मक काम करणारा हा तरुण म्हणजे अशोक देशमाने.

मराठवाड्याच्या दुष्काळी भागातून आलेल्या तरुणाला पुण्यात एका प्रसिद्ध आयटी कंपनीत चांगल्या पगाराची नोकरी लागणे म्हणजे अभावाकडून संपन्नतेकडे घेऊन जाणाऱ्या सुरक्षित आयुष्याचा दरवाजा उघडण्यासारखे आहे. पण काही काळ नोकरी केल्यानंतरही समाजासाठी काहीतरी करण्याचा ध्यास त्यांना शांत बसून देत नव्हता. त्यामुळे नोकरी सोडून आपले पुढील सर्व आयुष्य सामाजिक कार्यासाठी झोकून द्यायचा निर्णय त्यांनी घेतला.

शेतकरी बांधवाने आत्महत्या केल्यानंतर त्याचे कुटुंब उघड्यावर येते. मुलांच्या आयुष्याचे पुढे काय करायचे, या प्रश्नाचे अनेकदा उत्तरही नसते. अशा मुलांना त्यांच्या निवासासह दोन वेळच्या जेवणाची तसेच चांगले शिक्षण देण्याची जबाबदारी उचलण्यासाठी 'स्नेहवन' या संस्थेची स्थापना केली. प्रारंभीच्या काळात 'स्नेहवन' या संस्थेने भोसरी येथे दहा बाय दहाच्या दोन खोल्यांमध्ये आपले काम सुरू केले. त्यावेळी अठरा ते वीस मुलांचे जेवण, अभ्यास तसेच झोपणे या सर्व गोष्टींसाठी त्यांच्याकडे होती फक्त दहा बाय दहाची खोली. मुलांच्या सर्व खर्चाचे नियोजन सांभाळताना अशोकजींना काय कसरत करावी लागली असेल, हे त्यांनाच ठाऊक.

एकीकडे हा प्रपंच सांभाळण्याचा संघर्ष हसतमुखाने सुरू असतानाच चांगल्या कामाला मदत करण्यासाठी चांगली माणसे स्वतःहून पुढे येतात, याचाही अनुभव अशोकजींना येत होता. त्यानंतर लवकरच 'स्नेहवन'चा दुसरा टप्पा सुरु होणार होता.

हा दुसरा टप्पाही फार इंटरेस्टिंग आहे. आळंदीपासून नऊ किलोमीटर अंतरावर असलेल्या कोयाळी गावामध्ये डॉ. स्मिता आणि डॉ. रवींद्र कुलकर्णी दांपत्याची दोन एकर जागा पडीक होती. 'स्नेहवन' संस्थेचे प्रामाणिक काम पाहून या दांपत्याने संस्थेच्या कार्यासाठी ती दोन एकर जागा विनामुल्य देऊ केली. त्या जागेवर संस्थेचे काम नव्या जोमाने सुरू झाले. तेथेही अगदी पत्र्याच्या शेडपासून सुरुवात करीत आज दिमाखदार, सर्व सुविधांनी सुसज्ज अशा विठाई, रखुमाई, माऊली अशा तीन इमारती उभ्या राहिल्या आहेत. त्याशिवाय कंटेनरचे रुपांतर कार्यालयांमध्ये करुन त्यात प्रयोगशाळा, वाचनालय, कौशल्य विकास केंद्र सुरू केले आहेत. सध्या 'स्नेहवन'मध्ये साधारण ६५ मुले निवासी आहेत. भविष्यात दोनशे ते अडीचशे मुलांचा 'स्नेहवन'मार्फत सांभाळ करण्याची त्यांची तयारी आहे. येथील मुले जवळच्याच स्थानिक जिल्हा परिषद शाळा, हायस्कूलमध्ये रितसर प्रवेश घेऊन शिकत आहेत. पण महत्त्वाची बाब म्हणजे 'स्नेहवन'मध्ये फक्त जेवणे, राहणे, झोपणे या मुलभूत सुविधांच्याही पलिकडचे काम सुरू आहे. ते म्हणजे येथील प्रत्येक मुलाला (आता काही मुलींनाही प्रवेश दिला आहे) भविष्यात स्वतःच्या पायावर उभे करण्यासाठी, त्याच्या व्यक्तिमत्वाचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी जाणीवपूर्वक अव्याहत सुरू असलेले प्रयत्न. त्यासाठी येथे जे विविध प्रयोग तसेच उपक्रम राबविले जातात, ते प्रत्यक्ष भेट देऊन अभ्यासण्यासारखे आहे. 'स्नेहवन' ही संस्था शाळा नसतानाही या संकुलातील सुसज्ज ग्रंथालय, विज्ञान प्रयोगशाळा, कौशल्य विकास केंद्र, कलागुणांच्या संवर्धनासाठी विशेष दालन, उद्यमशीलता वृध्दिंगत व्हावी, यासाठीचे विशेष प्रयत्न, गीर गाईंचे पालन, बायोगॅस प्रकल्प, ओपन जीम, लाठीकाठी, मल्लखांब या खेळांचे प्रशिक्षण अशा या सर्वच गोष्टींचे अनुकरण प्रत्येक शाळेने करावे, असेच वाटते. विशेष म्हणजे या गोष्टींचे व्यवस्थापन मुलेच अगदी व्यवस्थितपणे सांभाळतात, हे फार भारी वाटले.

या शैक्षणिक प्रयोगांसाठी मी त्यांना महाराष्ट्राचा सोनम वांगचूक म्हणालो आहे. या गोष्टी वाचण्यापेक्षा प्रत्यक्ष 'स्नेहवन'ला भेट देऊन समजून घेणे आवश्यक आहे. ही सर्व माहितीही तेथील मुलेच देतात.

उद्योजक राजेश मंडलिक यांच्यामुळे अशोक देशमाने यांची ओळख व 'स्नेहवन'ची माहिती झाली. त्याबद्दल मी राजेशजींचा ऋणी आहे. सायकलिस्ट व गझलकार सुनीता रामचंद्र यांच्याबरोबर माझीही 'स्नेहवन' संस्थेमधील मुलांशी संवाद साधण्याची फार दिवसांपासूनची इच्छा होती. त्याप्रमाणे भेट देण्याचे ठरले. सुनीताजींनी त्यांचे सायकल मोहिमेतील इंटरेस्टिंग अनुभव मुलांना सांगितले. आम्ही नेहमीप्रमाणे आमच्या विषयाशी संबंधित बडबड केली. त्या संवादावेळी मुलांनी दिलेली चटपटीत पण अभ्यासपूर्ण उत्तरे म्हणजे 'स्नेहवन'च्या कार्याची लिटमस टेस्ट होती, असे म्हणायला हरकत नाही. कालच्या या भेटीनंतर मी फक्त अशोक देशमानेच नव्हे तर या संस्थेशी, मुलांशीही जोडला गेलो आहे. लवकरच परत एकदा 'स्नेहवन'मध्ये येणार आहे.

एकंदरीत २०२३ या वर्षाचा शेवट माझ्या नव्या संकल्पाला प्रेरणा देणारा ठरला आहे.

**- शशांक मोहिते**
भाषणकला, नेतृत्वकला प्रशिक्षक.

# 'स्नेहवन'मध्ये १०० मुलींची सोय

## रखुमाई- अनुराधा गानू कन्या छात्रालयाचे प्रदीप नाईक यांच्या हस्ते लोकार्पण



'स्नेहवन'मध्ये आता मुलांबरोबरच मुलींसाठी वसतिगृह झाले आहे. 'रखुमाई- अनुराधा गानू कन्या छात्रालय' असे या वसतिगृहाचे नाव असून याचा लोकार्पण सोहळा २२ डिसेंबर रोजी एअर चीफ मार्शल प्रदीप नाईक यांच्या हस्ते झाला.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून 'स्नेहवन'चे आधारस्तंभ वामन गानू (अमेरिका), श्री. आर. सी. कौशिक (Head of Sales, Linde- India, Bangladesh), श्री. सुदीश पणिकर (Managing Director, BNY Mellon, India) यांच्यासह 'स्नेहवन'चे आधारस्तंब डॉ. स्मिता आणि डॉ. रवींद्र कुलकर्णी उपस्थित होते.

'स्नेहवन'चे संस्थापक आणि सर्वेसर्वा अशोक देशमाने यांनी प्रास्ताविक केले. दोन खोल्यांपासून सुरू झालेला 'स्नेहवन'चा प्रवास आज दोन एकरांपर्यंत कसा पोहचला, हे त्यांनी सांगितले आणि या वाटचालीत ज्यांनी साथ दिली, त्या सर्वांचे आभार मानले.

एअर चीफ मार्शल प्रदीप वसंत नाईक यांनी भारताचे २२ वे एअर चीफ मार्शल

> **ज्या अपेक्षेने आलो होतो, त्यापेक्षा खूप काही चांगले येथे पाहायला मिळाले. देशासाठी निःस्वार्थपणे अविरत काम करणारे अनेक अशोक या देशामध्ये हवे आहेत.**
>
> **प्रदीप वसंत नाईक,** एअर चीफ मार्शल

म्हणून जबाबदारी पार पाडली आहे. सन १९७१ मध्ये झालेल्या भारत- पाक युद्धात देखील त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. त्यांच्या कारकीर्दीदरम्यान काही किस्से त्यांनी यावेळी मुलांना ऐकविले. रोजचे जीवन जगत असताना देशप्रेम कसे जपावे, हे देखील त्यांनी सांगितले. श्री. नाईक यांनी स्नेहवन प्रकल्पाची पाहणी करून समाधान व्यक्त केले.

श्री. आर. सी. कौशिक यांनी आपल्या भाषणात लिंडे (Lindeo कंपनीबद्दल माहिती दिली. ही गॅस उत्पादन कंपनी असून आम्ही लोकांना ऑक्सिजन पुरवतो, असे ते म्हणाले.

प्रा. दिगंबर ढोकळे यांनी कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन केले. डॉ. रवींद्र कुलकर्णी यांनी मान्यवरांसह उपस्थित सर्वांचे आभार मानले.

### पावसाच्या पाण्याची साठवण, सौरऊर्जा प्रकल्प

अनुराधा गानू कन्या छात्रालयाच्या वास्तूमध्ये शंभर मुलींची निवास व संगोपनाची सोय आहे. मुलींच्या सामानासाठी कपाटांसह सुंदर बंकबेड आहेत. या इमारतीवर रेन वॉटर हार्वेस्टिंगची (पावसाच्या पाण्याची साठवण) सुविधा असून त्यातून ३ लाख लिटर पाणी जमा होणार आहे. इमारतीवर २० किलोवॉटचा सौरऊर्जा प्रकल्पही आहे.

### अमेरिकास्थित वामन गानू यांचे मोलाचे सहकार्य

हा प्रकल्प पूर्ण करण्यासाठी श्री. वामन गानू (BNY Mellon, Linde Foundation, Century Enka Limited) यांचे अनमोल सहकार्य लाभले. त्याचप्रमाणे श्री. नितीन माने, श्री. सुशील कासवा, श्री. नीलेश लिमये यांनी मोलाचे साह्य केले.

# 'माऊली', 'विठाई'ला विज्ञानऋषींचा आशीर्वाद

## दोन इमारतींचे डॉ. माशेलकर यांच्या हस्ते उद्घाटन; शंभर मुलांची होणार सोय

जगप्रसिद्ध शास्त्रज्ञ, पद्मविभूषण डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्या हस्ते 'स्नेहवन' संचलित नलिनीताई कुलकर्णी ज्ञानग्राममध्ये 'माऊली' आणि 'विठाई' या दोन इमारतींचा लोकार्पण सोहळा झाला.

डॉ. रघुनाथ माशेलकर म्हणजे साक्षात विज्ञानऋषी... उत्तुंग व्यक्तिमत्व आणि हिमालयालाही लाजवेल असे कर्तृत्व. त्यांचा चरणस्पर्श 'स्नेहवन'ला झाला. मुलांना त्यांचे मार्गदर्शन व आशीर्वाद मिळाले. जणू 'स्नेहवन'ला परिसस्पर्श झाला. आयुष्याचे सोने झाल्याचा तो क्षण 'स्नेहवन'च्या प्रवासातील सर्वांत मौल्यवान आहे.

या सोहळ्याला क्लीन सायन्स अँड टेक्नॉलॉजी लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक अशोक बूब, कार्यकारी संचालक कृष्णकुमार बूब, माय लॅब डिस्कव्हरी सॉल्युशनचे अध्यक्ष शैलेंद्र कवाडे आणि 'स्नेहवन'चे आधारस्तंभ डॉ. स्मिता व डॉ. रवींद्र कुलकर्णी तसेच स्नेहवनवर अपार प्रेम करणारे, परिवारातील स्नेहीजन उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. दिगंबर ढोकळे यांनी केले.



### शंभर लेकरांना 'माऊली'ची माया

'माऊली' हे मुलांचे वसतिगृह क्लीन सायन्स अँड टेक्नॉलॉजी लिमिटेड (Clean Science and Technology Limited) या कंपनीने उभारून दिले आहे. या माध्यमातून 'स्नेहवन'मधील मुलांना हक्काचे पक्के घर मिळाले आहे. या इमारतीत शंभर मुलांची उत्तम सोय होणार आहे. 'माऊली'ची माया या लेकरांना मिळणार आहे.

### 'विठाई'मध्ये भोजनगृह, पाहुण्यांची सोय

'विठाई' या इमारतीसाठी माय लॅब डिस्कव्हरी सोल्युशन (My Lab Discovery Solutions), प्रयास शार्लोट (Prayas Charlotte), स्व. रोहन देव परिवार, कै. वंदना व वसंत पाटील ट्रस्ट, श्री. किशोर पारसेवार यांचे सहकार्य लाभले. मुलामुलींसाठी भोजनगृह, तसेच 'स्नेहवन'ला भेट देणाऱ्या पाहुण्यांची निवासाची सोय या इमारतीत होणार आहे.

स्नेहवन वार्ता
एक आशेचा किरण
जानेवारी २०२४

# मुलांना मिळाली ग्रामविकासाची माहिती

## राळेगणसिद्धी, हिवरे बाजारला सहल; अण्णा हजारे, पोपटराव पवार यांच्याशी संवाद

'स्नेहवन'मधील मुलांची दर तीन महिन्यांनी एक शैक्षणिक सहल काढली जाते. गेल्या महिन्यात मुलांना सुट्या लागल्याबरोबर ठरवले की, यावेळी ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांचे आशीर्वाद घेण्यासाठी राळेगणसिद्धीला सहल न्यायची.

'स्नेहवन'मधील मुले आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबातील, अतिशय दुर्गम भागातील आहेत. त्यांनी शिकून मोठे व्हावे आणि पुढे आपल्या गावासाठी, देशासाठी योगदान द्यावे, असे वाटते. बालवयात त्यांना तसे संस्कार मिळावेत, यासाठी 'स्नेहवन'मध्ये प्रयत्न केले जातात. विविध



क्षेत्रांतील मान्यवरांचे मार्गदर्शन आणि आशीर्वाद मुलांना खूप प्रेरणा देणारे असतात.

मुलांनी राळेगणसिद्धी गाव पाहिले. गावामध्ये सुरू असणाऱ्या उपक्रमांची माहिती घेतली. या उपक्रमांचा गावातील लोकांना कसा फायदा होतो, हे समजून घेतले. अण्णा हजारे यांनी आतापर्यंत केलेली सर्व आंदोलने- उपोषणांसंदर्भातील लेख आणि माहिती यांचा संग्रहही मुलांनी कुतुहलाने पाहिला. गाव पाहून झाल्यानंतर अण्णा हजारे यांनी मुलांना मार्गदर्शन केले. अण्णांनी आपला जीवनप्रवास मुलांसमोर उलगडला. मुलांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तरे दिली. त्यानंतर पोपटराव पवार यांच्या हिवरे बाजार गावाला भेट दिली. तेथील उपक्रम कसे चालतात, ते मुलांनी पाहिले. पोपटराव पवार यांनी मुलांशी संवाद साधला. त्यांच्या कार्याची आणि गावाची माहिती मुलांना दिली.

## नवे प्रकल्प

### 'स्नेहवन'- साखरशाळा

'स्नेहवन' संस्थेच्या परिसरात ऊसतोड कामगारांच्या १०- १२ टोळ्यांचा सध्या मुक्काम आहे. या टोळ्या साखर हंगाम सुरू असेपर्यंत म्हणजे किमान पाच महिने इथेच पालांमध्ये राहतील. टोळी म्हणजे ऊसतोड कामगारांचा गट. एका टोळीत बारा ते पंधरा जोडपी असतात. त्यांना कोयते म्हणतात. हे कामगार नगर, मराठवाड्यातून पोटासाठी येथे येतात. लेकरांना एकटे घरी ठेवता येत नाही म्हणून रोज त्यांना ऊस तोडणीच्या ठिकाणी बरोबर घेऊन जातात. ही मुले त्यांच्या गावातील शाळेत जात असतात, परंतु गावाकडे घरी सांभाळायला कोणी नसल्यामुळे ती पालकांबरोबर येतात. इथे पालांवर मोठ्या मुली छोटी बाळे सांभाळायचे काम करतात.

'स्नेहवन'ने एक छोटेसे पाऊल उचलत या लेकरांसाठी साखरशाळा सुरू केली आहे. पुढचे काही महिने या मुलांना 'स्नेहवन'मध्ये शिक्षण मिळणार आहे. 'स्नेहवन'कडून या मुलांना दप्तरे देण्यात आली आहेत. सामाजिक बांधिलकीचे संस्कार व्हावेत, यासाठी संस्थेतील मुलांना बरोबर घेऊनच संस्थेचे संस्थापक अशोक देशमाने यांनी या दप्तरांचे वाटप केले.

या शाळेची सुरुवात कशी होईल, याविषयी साशंकता होती. पण पहिल्याच दिवशी १८ मुले आली. त्यांचे पालकच त्यांना घेऊन आले. संस्थेतील मोठी मुले त्यांना शिकवत आहेत.

आपल्याला साखर देण्यासाठी असंख्य हात झटत असतात. इतक्या थंडीत त्यांना पालात राहावे लागते. आरोग्याच्या समस्यांनाही त्यांना तोंड द्यावे लागते. त्यांची मुले शिक्षणाच्या प्रवाहात राहावीत, त्यांचे भविष्य घडविण्याकरता हातभार लावावा, या उद्देशाने 'स्नेहवन'ने हा प्रकल्प सुरू केला आहे. संस्थेत आल्यानंतर या लेकरांच्या चेहऱ्यावर आनंद मावत नव्हता. पालकांनीही संस्थेचे आभार मानले. मुलांना रोज येथे पाठविणार असा शब्द दिला.

गेल्या दोन वर्षांपासून संस्थेत हा प्रकल्प राबविला जातो. त्याला ऊसतोड कामगारांकडून सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे.

### 'स्नेहवन'- नवचेतना

बंगाली कामगारांच्या मुलांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी तसेच त्यांना शिक्षण व संस्कार देण्यासाठी 'स्नेहवन'च्या माध्यमातून काही दिवसांपासून प्रयत्न सुरू आहेत.

समाजातील अज्ञान दूर व्हावे, राष्ट्र उभारणीसाठी प्रत्येक लेकराचे आयुष्य नवचैतन्याने भरून जावे, अशी त्यामागील भावना आहे. अशोक देशमाने यांनी घरी जाऊन या कामगारांशी व त्यांच्या मुलांशी संवाद साधला. सर्वांनी 'हरे कृष्णा' म्हणून स्वागत केले. मुलांना शिकवायची तयारी दाखवली. महिलांसाठी असलेल्या सावित्री सक्षमीकरण प्रकल्पालाही त्यांनी प्रतिसाद दिला.

मुलांना 'स्नेहवन'मध्ये शिकवायला सुरुवात केली आहे. पहिल्या दिवशी आठ- दहा मुले आली. ही संख्या आता २५ ते ३० पर्यंत गेली आहे. या कुटुंबांमध्ये बरेच व्यसनी आहेत. हळूहळू त्यांना व्यसनांपासून परावृत्त करण्याचाही प्रयत्न केला जाणार आहे.

## सिंहगडावर कचरासंकलनातून जागविली सामाजिक जाणीव

शाळेला सुट्या लागायच्या आधीच ठरवले होते की, मुलांना कोणता तरी किल्ला दाखवायला घेऊन जायचे. मुलांना विचारले कोणता किल्ला बघायचा, तर सर्वांनी पसंती दिली सिंहगडाला.

मुलांना सिंहगडला घेऊन गेलो. सगळ्यांनी संपूर्ण गड फिरून बघितला. ऐतिहासिक ठिकाणांची माहिती घेतली. जेवणाचा डबा बरोबर घेतला होता. गडावर जेवण केले. मुलांनी खूप मज्जा केली. सहलीचा आनंद लुटला.

परतताना सिंहगडाच्या पायथ्याशी मोठ्या प्रमाणात कचरा, पाण्याच्या प्लास्टिकच्या बाटल्या पडलेल्या दिसल्या. मुलांनी त्या बाटल्या आणि कचरा गोळा केला. गडावर केवळ सहलीचा आनंद न लुटता, या ऐतिहासिक ठिकाणाचे पावित्र्य जपा, असा संदेश मुलांनी आपल्या कृतीतून दिला.

## एबीपी न्यूज नेटवर्कचे राजीव खांडेकर यांची भेट

ज्येष्ठ संपादक, एबीपी न्यूज नेटवर्कचे एक्झिक्युटिव्ह व्हाईस प्रेसिडेंट (Executive Vice President) राजीव खांडेकर यांनी 'स्नेहवन'ला सदिच्छा भेट देऊन बालगोपाळांना आशीर्वाद दिले व मार्गदर्शन केले. त्यांनी संस्थेची माहिती जाणून घेतली. संस्थेची प्रगती पाहून समाधान व्यक्त केले.



## जिल्हा न्यायधीशांच्या भेटीत रंगली कविता, गीतांची मैफल

पुणे जिल्हा न्यायाधीश जयंत डोरले यांनी सहकुटुंब 'स्नेहवन'ला भेट देऊन आशीर्वाद दिले. सौ. डोरलेताई गायक असल्यामुळे, काही वेळ कविता आणि भक्तीगीतांची मैफल रंगली.

त्या दिवशी डोरले दांपत्याचा लग्नाचा वाढदिवस होता. त्यानिमित्त



सौ. डोरलेताईंनी स्वतःच्या हाताने मुलांसाठी डिंकाचे लाडू तयार करून आणले होते. दोघांनी संपूर्ण प्रकल्पाची आस्थेने पाहणी केली. मुलांशी दिलखुलास संवाद साधला. मुलांसाठी ही भेट संस्मरणीय ठरली.

## मल्लखांब स्पर्धेत सुरज जिल्ह्यात तिसरा



'स्नेहवन'मधील मुलांना खेळांचे प्रशिक्षणही दिले जाते. त्यापैकी एक म्हणजे मल्लखांब. संस्थेतील सुरज या विद्यार्थ्याने नुकताच जिल्हास्तरीय स्पर्धेत सहभाग घेतला. या स्पर्धेत पुणे जिल्ह्यात त्याचा तिसरा क्रमांक आला. क्रीडा क्षेत्रातील मानाच्या शिवछत्रपती पुरस्काराने सन्मानित राष्ट्रीय खेळाडू ऋषिकेश अरणकल्ले संस्थेतील मुलांना मल्लखांबाचे प्रशिक्षण देतात.

## दिवाळीनिमित्त उत्सव आपुलकीचा...

### Dress of Choice



नवीन ड्रेस हा मुलांसाठी खूप जिव्हाळ्याचा विषय असतो. त्यातही तो ड्रेस स्वतःच्या पसंतीचा मिळाला तर आणखीनच आनंद. हाच आनंद 'स्नेहवन'मधील मुलांनी दिवाळीच्या आधी लुटला. 'स्नेहवन'मधील सर्व मुलांना दरवर्षी दिवाळीला त्यांच्या आवडीचा नवीन ड्रेस खरेदी करून दिला जातो. त्यासाठी सर्वांना कपड्याच्या दुकानात नेण्यात येते. तेथे प्रत्येक जण आपल्या आवडीने ड्रेस निवडतो. या उपक्रमाला ड्रेस ऑफ चॉईस असे नाव दिले आहे. यावर्षीच्या खरेदीत मुलांनी कुर्त्याला पसंती दिली.

## बालगोपाळांनी साकारला जंजिरा किल्ला

दिवाळीत मुलांनी किल्ला उभारण्याची जुनी प्रथा आहे. 'स्नेहवन'मधील चिमुकल्या बालगोपाळांनी संस्थेच्या आवारात आपल्या कौशल्यातून जंजिरा किल्ला साकारला होता. किल्ल्यात छत्रपती शिवाजी महाराजांची मूर्ती ठेवली होती. मावळे, प्राणी, शामियाना, आखाडा, धरण, बाजारपेठ, तटबंदी, तरवाजा, तोफा, बुरुजांची आकर्षक मांडणी केली होती. चिमुकल्या हातांनी तीन ते चार दिवस राबत किल्ल्याची हुबेहूब प्रतिकृती साकारली होती. गडकिल्ल्यांचे संवर्धन आणि रक्षणाचा संदेश यातून मुलांनी दिला.



## पुस्तक प्रकाशनानिमित्ताने रंगला दिग्गजांचा मेळावा



यंदाच्या दिवाळीत 'स्नेहवन'ला सगळ्यांत सुंदर भेट डॉ. उल्का नाईक निंबाळकर यांनी दिली. उल्काताई जीएसटीमध्ये डेप्युटी कमिशनर या पदावर कार्यरत आहेत. गेल्या अनेक वर्षांपासून त्या 'स्नेहवन'शी जोडलेल्या आहेत. त्यांचे पती कवी समरेंद्र नाईक निंबाळकर यांच्या 'अवघा रंग एक झाला' या कवितासंग्रहाच्या दुसऱ्या आवृत्तीचे प्रकाशन 'स्नेहवन'मध्ये बालगोपाळांबरोबर दिवाळी पाडव्याच्या दिवशी झाले. या कार्यक्रमाच्या निमित्ताने कुटुंबीय आणि मित्रपरिवाराने स्नेहवनला भेट द्यावी, हा विचार त्यामागे होता.

पहिल्या आणि दुसऱ्या आवृत्तीच्या वितरणातून जमा झालेला संपूर्ण निधी एक लाख एक हजार त्यांनी 'स्नेहवन'मधील मुलांच्या शिक्षण आणि संगोपनासाठी दिला. या कार्यक्रमाच्या निमित्ताने प्रशासकीय सेवेतील अनेक दिग्गजांनी स्नेहवनला भेट दिली, मुलांशी संवाद साधून मोलाचे मार्गदर्शन केले.

एक आशेचा किरण
स्नेहवन वार्ता
जानेवारी २०२४

# ठाण्याच्या आचार्य अत्रे कट्टातर्फे 'स्नेहवन'ला कृतज्ञता पुरस्कार




आचार्य अत्रे कट्टा, ठाणे यांच्यातर्फे प्रतिष्ठेचा कृतज्ञता पुरस्कार 'स्नेहवन' संस्थेला जाहीर झाला आहे. एक लाख रुपये रोख आणि स्मृतिचिन्ह असे पुरस्काराचे स्वरुप आहे. संस्थेचे देवदत्त चंदगडकर यांच्या हस्ते २ डिसेंबरला या पुरस्काराचे वितरण झाले.

या पुरस्काराचे एक लाख रुपये मुलींच्या शिक्षणासाठी समर्पित करण्याचा निर्णय अशोक व अर्चना देशमाने यांनी घेतला आहे. हा पुरस्कार आमचा एकट्याचा नसून तो समाजाचा आहे, अशी प्रतिक्रिया देशमाने दांपत्याने व्यक्त केली आणि पुरस्काराबद्दल सौ. सुचित्रा आणि देवदत्त चंदगडकर, संपदा वागळे आणि आचार्य अत्रे कट्टा, ठाणे यांचे आभार मानले.

# कन्यापूजन कार्यक्रमातून मुलींविषयी आदर व्यक्त

मुली व महिलांविषयी मुलांच्या मनात कायम आदराचे भावना राहावी, या उद्देशाने 'स्नेहवन'मध्ये कन्यापूजन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. संस्थेतील मुलांनी मुलींची पूजा केली. मुली साक्षात देवीचे रूप आहेत, या भावनेने सर्वांनी त्यांचे दर्शन घेतले.

संस्थेच्या परिसरातील काही कामगार महिलांचेही पूजन केले. यातून कोणतेही काम लहान नाही, हे मुले शिकतील. त्याबरोबरच शाळेत किंवा इतर कोणत्याही ठिकाणी मुलींना त्रास होईल, असे वागणार नाही, कधी छेड काढणार नाही, प्रत्येक मुलीला बहिणीसमान वागवेन, अशी शपथ मुलांनी घेतली. निरोगी समाजाची निर्मिती करण्यासाठी बालमनावर असे संस्कार होणे गरजेचे आहे.

# पारदर्शक व्यवहारांसाठी 'गिव्ह'चे गोल्ड सर्टिफिकेट




गिव्ह (Give) या संस्थेमार्फत 'स्नेहवन'ला गोल्ड सर्टिफिकेट मिळाले. त्याचप्रमाणे संपूर्ण व्यवहारात पारदर्शकता राखल्यामुळे पाचपैकी पाच गुण (रेटिंग) मिळाले.

या प्रवासात 'स्नेहवन'शी जोडलेल्या प्रत्येकाचे आशीर्वाद मोलाचे आहेत.

# मुलांना शिकविण्यासाठी आली जपानी विद्यार्थिनी



फुका नारिता (Fuka Narita) जपानमधील महाविद्यालयीन विद्यार्थिनी सध्या 'स्नेहवन'च्या मुलांना शिकविण्यासाठी आली आहे. ती सहा आठवडे स्नेहवन परिवाराचा भाग होऊन इथे राहणार आहे. एआयएसईसी (AISEC) या संस्थेने तिला या कामाची संधी दिली आहे.

# पाचशे नवीन पुस्तकांचे आणखी एक ग्रंथालय



'स्नेहवन'मधील मुलांच्या छात्रालयात पाचशे पुस्तकांच्या नवीन ग्रंथालयाची उभारणी करण्यात आली आहे. या नवीन ग्रंथालयातील पुस्तकांसह 'स्नेहवन'मध्ये आता पंधरा हजार पुस्तकांचा संग्रह मुलांच्या बुद्धीला सक्षम करण्यासाठी उपलब्ध आहे.

## फोटो स्टोरी



'स्नेहवन'चे आत्मनिर्भरतेकडे आणखी एक पाऊल.
२० किलोवॅटचा नवीन सौरऊर्जा प्रकल्प कार्यान्वित.



संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्याचे मालक, संत हैबतबाबा यांचे वंशज बाळासाहेब आरफळकर महाराजांनी 'स्नेहवन'ला भेट देऊन आशीर्वाद दिले.



नवरात्रीच्या मुहूर्तावर 'स्नेहवन'मधील मुलांसाठी लाठीकाठी प्रशिक्षण वर्ग सुरू करण्यात आला. शारीरिक ताकद, स्वसंरक्षण आणि आत्मविश्वास यासाठी मुलांना हा वर्ग फायदेशीर ठरत असून श्रीमती क्षीरसागर ताई यांच्याकडून हे प्रशिक्षण दिले जात आहे.



आपल्या निर्भिड कार्य- कर्तृत्वासाठी दोन वेळा राष्ट्रपती पदक मिळविलेले, सामाजिक कार्यात सदैव तत्पर असणारे, कर्तव्यदक्ष अधिकारी, पीएमआरडीए, पुणे शहराचे मुख्य फायर ऑफिसर देवेंद्र पोटफोडे यांनी 'स्नेहवन'ला भेट देऊन आशीर्वाद दिले.



बीजमाता पद्मश्री राहीबाई पोपेरे यांच्या हस्ते 'स्नेहवन'च्या मातेचा सन्मान करण्यात आला. गॅलक्सी शाळेचे आणि मुख्याध्यापिका मनीषाताईंचे मनःपूर्वक आभार.



'स्नेहवन'मधील श्यामचा वाढदिवस साजरा केला. परभणी जिल्ह्यातील हे लेकरू फारच गोड आणि प्रेमळ आहे. नियतीने बालवयातच त्याला असंख्य दुःखे दिली. परंतु त्याच्या चेहऱ्यावरचा आनंद कधी कमी झाला नाही.